विभागीय आयुक्त यांचे कार्यालयातील
विकास शाखेतील अस्थायी पदे पुढे
चालू ठेवण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः अराप-२०१७/प्र.क्र.१२६/आस्था-९
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,
दिनांक: ३० ऑक्टोबर , २०१७.

वाचा -

१) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक असंक-१००१/प्र.क्र.२९/२००१/वित्तीय सुधारणा, दिनांक -१० सप्टेंबर, २००१
२) शासन निर्णय,ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्रमांक अराप २००२/ प्र.क्र.७४/ आस्था-९, दिनांक-१४ जुलै,२००३
३) शासन निर्णय क्रमांकः शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्रमांक:- मविसे-१०/२००१/ प्र.क्र.३७६४/ आस्था-३, दिनांक ४ जून, २००३
४) शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्रमांक अराप-२०१५/प्र.क्र.१२१/ आस्था-९, दिनांक :- १६ एप्रिल, २०१५.
५) शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्रमांक अराप-६५१६/प्र.क्र.३७/ आस्था-९, दिनांक :- ७ एप्रिल, २०१७.
६) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक पदनि-२०१६/प्र.क्र.०८/आपुक, दिनांक -०३ ऑक्टोबर, २०१७.

शासन निर्णय

वित्त विभागाच्या उपरोक्त संदर्भ क्रमांक १ येथील शासन निर्णयातील तरतूदीनुसार सर्व शासकीय विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील क्षेत्रिय कार्यालयातील पदांचा आढावा त्यांचेकडे असलेल्या योजना व उपलब्ध कार्यभार लक्षात घेवून घ्यावयाचा असून अशा आढाव्याअंती व्यपगत झालेली पदे पुनर्जिवित करुन भरणे , रिक्त पदे भरणे, आवश्यकते नुसार नवीन पदे निर्माण करणे व अतिरिक्त ठरलेली पदे रद्द करणे ही कार्यवाही करावयाची होती. त्यानुसार विभागाच्या क्षेत्रिय कार्यालयातील पदांचा आढावा दिनांक २४ मार्च, २००३ रोजी झालेल्या उच्च स्तरीय सचिव समितीच्या बैठकीत घेण्यात आला व समितीने या विभागाचा आढावा मान्य केला. उच्च स्तरीय सचिव समितीच्या मान्यतेनुसार या विभागासाठी अनिवार्य ठरविण्यात आलेल्या प्रपत्र अ मध्ये दर्शविलेल्या विवरण पत्र १,२,३,व ४ मधील विविध संवर्गातील १०९ व विवरण पत्र ५ येथील शाखा अभियंत्याच्या ४ पदाचा सुधारित आकृतीबंध उपरोक्त अनुक्रमे संदर्भ क्रमांक २ व ३ येथील शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आला आहे.

२. वित्त विभागाच्या दि. १०.२.२०१७ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयातील मंजूर पदांचा आढावा घेऊन सुधारीत आकृतीबंध निश्चित करण्यास

दि.३०.४.२०१७ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे.वित्त विभागाच्या दि.३.१०.२०१७ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय विभागांना त्यांच्या आकृतीबंधात समाविष्ठ असलेल्या अस्थायी पदांना दि.३१.१२.२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्याचे अधिकार संबंधीत प्रशासकीय विभाग प्रमुखांना प्रदान केलेले आहेत. सदर अधिकाराचा वापर करून विभागीय आयुक्त कार्यालयातील विविध संवर्गातील १०९ व शाखा अभियंत्याची ४ पदे मागील वर्षात दिनांक १.३.२०१७ ते ३०.०९.२०१७ पर्यंत चालू ठेवण्यास उपरोक्त संदर्भ क्रमांक ५ येथील शासन निर्णयान्वये शासनाची मंजूरी देण्यात आली होती. आता उपरोक्त पदांना दिनांक ०१.१०.२०१७ ते दि.३१.१२.२०१७ पर्यंत पुढे चालू ठेवण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३. सोबतच्या विवरणपत्र १, २, ३, ४ व ५ मध्ये नमुद केलेल्या अस्थायी पदांचा खर्च त्यांच्या विहित लेखाशिर्षाखाली सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात मंजूर करण्यात आलेल्या निधीमधून भागविण्यात यावा.

४. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन निर्णय क्रमांक पदनि -२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दिनांक ०३.१०.२०१७ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१०२६१५१२३०७४२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Girish Dinkar Bhalerao

Digitally signed by Girish Dinkar Bhalerao
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ca8fd093b771c4573a3a57cff525280d3134f0f7af228e47d44bd71716c64fc3, cn=Girish Dinkar Bhalerao
Date: 2017.10.30 14:24:06 +05'30'

गिरीश भालेराव
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. विभागीय आयुक्त, कोकण भवन, नवी मुंबई / नाशिक / पुणे / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.
२. महालेखाकार, महाराष्ट्र राज्य (१), मुंबई.
३. महालेखाकार, महाराष्ट्र राज्य (२), नागपूर.
४.अधिदान व लेखाधिकारी, मुंबई,
५. संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६. संचालक, लेखा व कोषागारे महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७. वित्त विभाग, कार्यासन क्रमांक व्यय-१५ व अर्थसंकल्प १९, अर्थ-३, अर्थ-१६

८. अवरसचिव /कक्षअधिकारी, कार्यासन क्रमांक-पंचायत राज-१/आस्था-३/आस्था-८/आस्था-१२/ आस्था- १ / वित्त-७/ वित्त-८ व वित्त-९ ग्राम विकास व जलसंधारण विभाग मंत्रालय मुंबई-३२.

९. निवड नस्ती आस्था-९, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय मुंबई-३२.

प्रपत्र- अ

शासन निर्णय ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक-अराप-६५१७/प्र.क्र.१२६/आस्था-९, दिनांक ३० ऑक्टोबर, २०१७ अन्वये जी पदे दिनांक १.१०.२०१७ ते दिनांक ३१.१२.२०१७ पर्यंत पुढे चालू ठेवण्यास शासनाची मंजूरी दिलेली आहे त्याचा तपशील.

विवरणपत्र-१

लेखाशीर्ष -मागणी क्रमांक २ प्रधान लेखाशीर्ष -२०५३- जिल्हा प्रशासन -१०१ (आयुक्त) (०१) (०१)पंचायत राज संस्थासाठी निरिक्षण पथके (सामुहिक विकास कार्यासाठी मंजुर केलेल्या कर्जावरील खर्चाचा मेळ घालविण्यासंबंधीच्या कामासाठी कर्मचारी वर्ग) (२०५३ ०५९२) (दत्तमत्त) (योजनेत्तर) मागणी क्रमांक एल-२.

अ.क्र.	कार्यालयाचे नांव	पदनाम व पदांची संख्या										
		सहाय्यक संचालक (विकास)	**अव्वल कारकुन**	**संशोधन सहाय्यक**	**प्रमुख लेखा पाल**	**उपलेखा पाल**	**लघुलेखक (उच्चश्रेणी)**	**वरिष्ठ लिपिक**	**कनिष्ठ लिपिक**	**टंकलेखक तथा लिपिक**	**वाहन चालक**	**एकूण पदे**
१	**२**	**३**	**४**	**५**	**६**	**७**	**८**	**९**	**१०**	**११**	**१२**	**१३**
१	आयुक्त कोकण विभाग नवी मुंबई	१	१	१	१	-	-	-	-	-	-	४
२	आयुक्त नाशिक विभाग नाशिक	१	५	१	१	१	१	-	-	३	२	१५
३	आयुक्त पुणे विभाग, पुणे	१	-	-	१	-	-	-	-	-	-	२
४	आयुक्त औरंगाबाद विभाग औरंगाबाद	१	-	१	१	-	-	-	-	-	२	५
५	आयुक्त अमरावती विभाग अमरावती	१	-	१	१	१	-	७	१	२	२	१६
६	आयुक्त नागपूर विभाग नागपूर	१	-	-	१	-	-	-	१	-	-	३
	एकूण	६	६	४	६	२	१	७	२	५	६	४५

विवरणपत्र-२
लेखाशीर्ष- मुख्य लेखाशीर्ष २०५३ - जिल्हा प्रशासन-१०१ आयुक्त (०२) (०१) जिल्हा परिषद व पंचायत समित्या प्रशासन (२०५३०६०९) (दत्तमत्त) (योजनेतर) मागणी क्रमांक एल-२.

अ.क्र	कार्यालयाचे नांव	पदनाम व पदांची संख्या						
		वरिष्ठ सहाय्यक	कनिष्ठ सहाय्यक	लघुटंक लेखक	लघुलेखक निम्नश्रेणी	कक्ष अधिकारी	संगणक ऑपरेटर	एकूण पदे
१	२	३	४	५	६	७	८	९
१	आयुक्त,कोकण विभाग,नवी मुंबई	१	२	१	१	१	१	७
२	आयुक्त ,नाशिक विभाग, नाशिक	१	३	१	१	१	-	७
३	आयुक्त,पूणे विभाग,पुणे	१	२	१	१	१	१	७
४	आयुक्त औरंगाबाद विभाग,औरंगाबाद	१	३	१	१	१	१	८
५	आयुक्त अमरावती विभाग, अमरावती	१	२	१	१	१	१	७
६	आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर	१	२	१	१	१	१	७
	एकूण	६	१४	६	६	६	५	४३

विवरणपत्र-३

लेखाशीर्ष मागणी क्रमांक २ प्रधान लेखाशीर्ष -२०५३- जिल्हा प्रशासन -१०१ (आयुक्त) (०१) (०१)पंचायत राज संस्थासाठी निरिक्षण पथके (सामुहिक विकास कार्यासाठी मंजुर केलेल्या कर्जावरील खर्चाचा मेळ घालविण्यासंबंधीच्या कामासाठी कर्मचारी वर्ग) (२०५३ ०५९२) (दत्तमत्त) (योजनेत्तर) मागणी क्रमांक एल-२.

अ.क्र.	कार्यालयाचे नांव	पदनाम				एकूण
		उपलेखापाल	अव्वल कारकून	कारकून तथा टंकलेखक	शिपाई	
१	विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक	१	१	-	-	२
२	विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पूणे	-	२	-	-	२
३	विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद	-	-	-	१	१
४	विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती	१	-	-	-	१
५	विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर	१	१	१	-	३
	एकूण	३	४	१	१	९

विवरणपत्र -४

लेखाशीर्ष- मुख्य लेखाशीर्ष २०५३ - जिल्हा प्रशासन-१०१ आयुक्त (०२) (०१) जिल्हा परिषद व पंचायत समित्या प्रशासन (२०५३०६०९) (दत्तमत्त) (योजनेतर) मागणी क्रमांक एल-२.

अ.क्र.	कार्यालयाचे नांव	पदनाम		एकूण
		लघुलेखक	चपराशी	
१	२	३	४	५
१	विभागीय आयुक्त, कोकण विभाग,नवी मुंबई	१	१	२
२	विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक	१	१	२
३	विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे	१	१	२
४	विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग औरंगाबाद.	१	१	२
५	विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती	१	१	२
६	विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर.	१	१	२
	एकूण	६	६	१२

विवरण पत्र -५

लेखाशीर्ष-२०५३ जिल्हा प्रशासन १०१, आयुक्त (२) जिल्हा परिषद व पंचायत समित्या प्रशासन (२०५३०६०९).

अ.क्र.	पदांचे नांव	विभागीय आयुक्त कार्यालयाचे नांव / पदांची संख्या				एकूण पदे
		नाशिक	पुणे	औरंगाबाद	नागपूर	
१	२	३	४	५	६	७
	शाखा अभियंता	१	१	१	१	४